# -:प्रेसनोट:-

## दुय्यम निबंधक श्रेणी-१ चंद्रपूर व त्यांचे ऑपरेटर यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूरची कारवाई

दुय्यम निबंधक, मुद्रांक नोंदनी विभाग, कार्यालय चंद्रपूर येथील श्री. मोहन चंद्रकांत शेटट्टीवार, दुय्यम निबंधक श्रेणी - १ चंद्रपूर यांनी तक्रारदार यांचे पक्षकार यांच्या मालमत्तेच्या दस्तऐवजाची रजीस्ट्री करून देण्याचे कामाकरीता तक्रारदार यास प्रत्येक रजीस्ट्रीवर २,०००/- रू असे दोन मालमत्तेच्या रजीस्ट्रीचे एकूण ४,०००/- रू ची मागणी करून त्यांचे डाटा ऑपरेटर मार्फत स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांचे पथकाने आज दि. १६/०६/२०२६ रोजी कार्यवाही केली.

यातील तक्रारदार यांनी त्यांचे पक्षकार यांची भद्रावती तालूक्यातील मालमत्तेची नोंदणी होण्याकरीता दुय्यम निबंधक कार्यालय चंद्रपूर येथे कागदपत्रे सादर केली असता आलोसे श्री. मोहन चंद्रकांत शेटट्टीवार, दुय्यम निबंधक श्रेणी - १ चंद्रपूर यांनी दुय्यम निबंधक कार्यालय चंद्रपूर येथे दस्तऐवजाची नोंदणी केली. त्याबदल्यात त्यांचे ऑपरेटर मार्फत ४,०००/- रूपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना आरोपी श्री. मोहन चंद्रकांत शेटट्टीवार, दुय्यम निबंधक श्रेणी - १ चंद्रपूर यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी दि.१६/०६/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन तक्रार दिली.

तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीवरून दि.१६/०६/२०२६ रोजी आरोपी श्री. मोहन चंद्रकांत शेटट्टीवार, दुय्यम निबंधक श्रेणी - १ चंद्रपूर यांची पंचासमक्ष पडताळणी व सापळा कारवाई केली असता त्यांनी तक्रारदार यांचे पक्षकार यांच्या मालमत्तेच्या दस्तऐवजाची नोंदणी करून दिल्याचा मोबदला म्हणून ४,०००/- रूपये लाचेची मागणी करून त्यांचे ऑपरेटर मार्फत स्विकारले. पुढील तपास कार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, श्रीमती माधुरी बावीस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात श्री. अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक सचिन धर्मेजवार व सापळा पथक पो.हवा. हिवराज नेवारे, रविकांत इंगळे, विर्जेद्र वाढई, पो.शि. अमोल सिडाम, राकेश जांभुळकर, प्रदिप ताडाम, सचिन गजभिये, महेश माहुरपवार, म.पो.शि. मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर व चापोशि/संदिप कौरासे, मो.प.वि. चंद्रपूर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर


श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९८२३२७०५८१
श्री. सचिन धर्मेजवार, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९६२३०५५६५५

**Toll Free No. 1064** **Phone No. : 07172-250251** **Mob. No. 8379951064**
**Email: acbchandrapur@gmail.com** **Website: www.acbmaharashtra.gov.in**


कार्यालय पोलीस उप अधीक्षक ... चंद्रपूर

(स्वाक्षरी)

( अनिल जिट्टावार )
पोलीसउपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर